दैनिक
# सह्याद्रीचा राखणदार
www.sahyandrinews.com
Scan QR code to visit... Epaper Portal
• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •
• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ वे • अंक ४४ • Title - Code :- MAHMAR49513 • शनिवार दि.४ नोव्हेंबर २०२३ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

# आमदार धानोरकरांचा रुद्रावतार..

## महावितरणच्या अधिकाऱ्यांसह कर्मचाऱ्यांना कोंडले कार्यालयात




**वरोरा । प्रतिनिधी**

वरोरा तालुक्यातील शेतकऱ्यांच्या कृषी पंपांना दिवस थ्री फेज वीजपुरवठा देण्याची मागणी आमदार प्रतिभाताई धानोरकर यांनी केली होती. या मागणीला सरकार कडून कुठलाच प्रतिसाद मिळाला नसल्याने शुक्रवार ३ नोव्हेंबर २०२३ रोजी सकाळी ११ वाजता कार्यकारी अभियंता महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मर्या वरोरा, कार्यालयावर शेकडो शेतकरी व पदाधिकारी तसेच कार्यकर्त्यांना घेऊन आमदार प्रतिभा धानोरकर यांनी मोर्चा काढत कार्यालयात जाऊन अधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले / चर्चेत कुठलाच निर्णय न झाल्याने आमदार धानोरकरांनी अधिकाऱ्यांसह कर्मचाऱ्यांना कार्यालयात कोंडून कार्यालयाला कुलूप लावले .त्यानंतर कार्यालयाच्या बाहेर बसून ठिय्या आंदोलन करून हुकूमशाही सरकारचा निषेध केला.

यावेळी भद्रावती नगर परिषदेचे नगराध्यक्ष अनिल धानोरकर, वरोरा तालुका काँग्रेस अध्यक्ष मिलिंद भोयर, शहर काँग्रेस अध्यक्ष विलास टिपले, कृषी उत्पन्न बाजार समिती माजी सभापती विशाल बदखल, कृषी उत्पन्न बाजार समिती माजी सभापती राजेंद्र चिकटे, भद्रावती काँग्रेस शहर अध्यक्ष सुरज गावंडे, माजी नगरसेवक राजू महाजन, वरोरा तालुका महिला अध्यक्ष ऐश्वर्या खामनकर, शुभम चिमुरकर, प्रमोद मगरे, बसंत सिंग, निलेश भालेराव, मनोहर स्वामी, फिरोज पठाण, प्रमोद काळे, पुरुषोत्तम पावडे, रवींद्र धोपटे, संजय घागी, गणेश घागी, रत्नमाला अहिरकर, माधुरी चिकटे, सविता सुपी, योगेश खामणकर, अनिल झोटिंग, किशोर डुकरे, मयूर विरुटकर, अनिरुद्ध देठे, विलास गावंडे, सुधाकर कडुकर, किशोर डुकरे, प्रशांत झाडे, प्रमोद नागोसे, संदीप कुमरे, रितेश वाढई, तन्वीर शेख, महेश कोथडे, निखिल राऊत, गुरु थई, सचिन पचारे यांची उपस्थिति होती.

### दोन दिवसापूर्वी दिला होता आंदोलनाचा इशारा

चंद्रपूर जिल्हात खासगी व शासकीय वीजनिर्मिती केंद्राच्या माध्यमातून ४४२० मे. वॅ. वीजनिर्मिती होते. जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात झुडपी व मोठे जंगल आहे. रात्रीपाळीत शेतकरी कृषिपंपातून शेतीला पाणीपुरवठा करीत असतात. यावेळी हिंस्त्र प्राणी शेतकऱ्यावर हल्ला करीत असतात. यात शेकडो शेतकऱ्यांनी आपले प्राण गमावले आहेत. २ दिवसात चंद्रपूर जिल्ह्यात २४ तास थ्री फेस वीजपुरवठा न केल्यास जिल्ह्यातील वीज वितरण कार्यालयाला टाळे बंद आंदोलन करण्याच्या इशारा आमदार प्रतिभा धानोरकर यांनी ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस यांना दिला होता. परंतु सरकारकडून कुठलाच प्रतिसाद मिळाला नसल्याने हे आंदोलन करण्यात आले.

### आंदोलनाने अधिकारी नरमले

वीज वितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांना आमदार धानोरकर यांच्या रुद्रावताराला सामोरे जावे लागले . तब्बल एक तास कार्यालयात कोंडून ठेवलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांची पोलिसांच्या मध्यस्थीने सुटका झाली त्यानंतर वीज वितरण कंपनीचे अधिकारी नरमले असून हि मागणी दोन दिवसात पूर्ण करणार असे आश्वासन दिले. परंतु हे आश्वासन पूर्ण न केल्यास मुख्य अभियंता वीजवितरण कंपनी मर्या चंद्रपूर येथे यापेक्षा तीव्र आंदोलन करू असा इशारा आमदार प्रतिभा धानोरकर यांनी दिला आहे.

## स्मार्ट प्रकल्पा अंतर्गत टेमूर्डा येथे शेतकरी उत्पादक कंपनी गोदाम बांधकाम भुमीपूजन संपन्न

**वरोरा । प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाच्या जागतिक बँक अर्थसहाय्यीत प्रकल्पा अंतर्गत बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन प्रकल्प अंतर्गत वरोरा तालुक्यातील टेमुर्डा येथील कृषकोन्नती कृषी विकास आदिवासी शेतकरी उत्पादक कंपनी टेमुर्डा यांना प्रकल्प उभारणीसाठी गोदाम बांधकामाचे व प्रतवारी शेडचे भुमीपूजन संपन्न झाले.

या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून आबीद अली संचालक वैनगंगा व्हॅली महासंघ चंद्रपूर यांनी फित कापून पुजन केले यावेळी नोडल अधिकारी ( स्मार्ट) नंदकुमार घोडमारे यांनी कुदळ मारून भुमीपूजन केले . कार्यक्रमाचे प्रास्तावीक बंडु डाखरे अध्यक्ष कृषकोन्नती कृषीविकास आदीवासी शेतकरी उत्पादक कंपनी यांनी प्रकल्पाची उभारणी व कंपनीचे कार्याची विस्तृत माहीती दिली .आबिद अली यांनी शेतकरी उत्पादक कंपनी शेतकर्याची चळवळ म्हणून पुढे येत आहे. केन्द्र शासन व राज्यशासन राबवित असलेले उपक्रम हे शेतकऱ्यांचे शोषण होऊ नये व शेतकऱ्यांना उत्पादना बरोबर प्रक्रीया उद्योगातून आर्थिक बळ मिळावे . व्यापारी वर्गापासून बळीराजाची पिळवणुक थांबवून बाजार भावाचे चढ उतार , साठवणूकीची समस्या सुटावी व शेतकर्याना उत्पादनात वाढ , शेतमाल प्रक्रीया व रोजगार निर्मीती करण्यासाठी शेतकरी उत्पादक कंपन्या पुढे आल्या आहेत. सभासदानी व परिसरातील शेतकरी बांधवांनी या मध्ये सक्रीय सहभाग घेऊन लाभ मिळविण्याची संधी उपलब्द झाल्याने नवनविन तंत्रज्ञान , उत्तम दर्जाचे बि-बियाणे वापर करून



पिकपद्धतीत बदल करुन गरजे नुसार पिक फेरपालट करावे . शासकीय योजनाचे माध्यमातून वखार पावतीवर तारण सारख्या संधी उपलब्ध होणार असल्याचे मत व्यक्त केले. नंदकुमार घोडमारे नोडल अधिकारी स्मार्ट यांनी जिल्हयात २५ प्रकल्प प्रस्ताव तयार आहेत व १५ प्रकल्पाना प्राथमिक मान्यता मिळाल्याची माहिती दिली.जिल्ह्यात ४ कामाची सुरूवात झाली असून नोव्हेबर अखेर १० कामे सुरु करता येईल असे सांगितले . विनय गौडा जिल्हाधिकारी चंद्रपूर व .प्रिती हिरळकर प्रकल्प संचालक (आत्मा) हे सतत पाठपुरावा करीत असून बॅक प्रशासन देखील सकारात्मक प्रतिसाद देत असल्याने जिल्ह्यातील शेतकरी उत्पादक कंपनीच्या कामाना गती मिळालीआहे .असे मत व्यक्त केले .यावेळी मुकेश जिवतोडे जिल्हा प्रमुख शिवसेना (उबाठा) चंद्रपूर , वरोरा तालुका उपविभागीय कृषी अधिकारी सुशांत लव्हाटे , विभागीय स्मार्ट टिम चे कार्यकारी अभियंता हेमंत जोशी , कैलास संसारे , संपादन अधिकारी, सत्यपाल ठाकरे विभागीय मुल्य साखळी तज्ञ, प्रगती चव्हाण म.कृ.अ टेमुर्डा, प्रतिक भेंडे , संतोष खडतर , व्हि डी घागी , मुंढे यांचे सह कंत्राटदार सजई इन्फ्रा स्टील चे स्वप्नील आठवले , सोनटक्के , बालाजी धोबे (सीईओ )वैनगंगा व्हॅली ,विलास माटे सीईओ , वराडकर सरपंच चिंचोळा, सिध्दांत नगराळे, व्यवस्थापक बँक ऑफ महाराष्ट्र, संचालक व सदस्य कृषकोन्नती कृषीविकास आदीवासी शेतकरी उत्पादक कंपनी व परिसरातील शेतकरी उपस्थीत होते.


## लॉयडस मेटल स्पंज आर्यन अँड पॉवर कंपनीच्या सी एस आर फंडच्या खर्चाची चौकशी होणार

### उद्योगमंत्री सावंत यांनी दिले आश्वासन

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

चंद्रपूर जिल्ह्यातील घुग्घुस, उसगाव आणि वडा या गावांमध्ये असलेल्या लॉयडस मेटल स्पंज आर्यन अँड पॉवर कंपनीने सी एस आर फंडातून खर्च केलेल्या सन २०१३ पासून आजपर्यंतच्या केलेल्या कार्याची चौकशी होणार आहे. याबाबत चंद्रपूरचे काँग्रेस नेते दिनेश चोखारे यांनी निवेदन दिल्यानंतर उद्योग मंत्री उदय सामंत यांनी आश्वासन दिले आहे.

चंद्रपूर जिल्ह्यातील या कंपनीमुळे मोठ्या प्रमाणात प्रदूषण होत आहे. या प्रदूषणामुळे परिसरातील लोकांच्या आरोग्यावर परिणाम होत आहे. कंपनीने वर्षातून चार वेळा कंपनीच्या माध्यमातून प्रदूषणग्रस्त लोकाकरीता आरोग्य शिबिर लावायला पाहिजे होते. परंतु तशी कुठलीही प्रक्रिया किंवा योजना कंपनीमार्फत राबविली जात नाही. तसेच कंपनीद्वारे अनेक प्रकारचे नियम धाब्यावर बसून कामगारांचे शोषण केले जात आहे.याबाबत चंद्रपूर जिल्ह्यातील दिनेश चोखारे यांनी उद्योग



मंत्री उदय सामंत यांना पत्र दिले. या पत्रात त्यांनी कंपनीच्या सी एस आर फंडच्या खर्चाची चौकशी करण्याची मागणी केली होती.मंत्री सामंत यांनी ही मागणी मान्य केली आहे. त्यांनी सांगितले की, कंपनीच्या सी एस आर फंडच्या खर्चाची सखोल चौकशी केली जाईल. या चौकशीमध्ये प्रदूषण, कामगार शोषण यासह इतरही बाबींचा समावेश असेल.

## घरपट्टे नसलेल्या अनुसूचित जाती प्रवर्ग बांधवांना रमाई आवास योजना अंतर्गत लाभ द्या-आ.किशोर जोरगेवार

### राष्ट्रीय अनुसुचित जाती आयोगाकडे मागणी

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

अनुसूचित जाती प्रवर्गातील अनेक बांधवाचे नाव पंतप्रधान घरकुल आवास योजनेत आले आहे. मात्र या योजनेत घरपट्याची अट असल्याने त्यांना योजनेपासून वंचित रहावे लागत आहे. ही बाब लक्षात घेता या सर्व लाभार्थ्यांना रमाई आवास योजनेत समाविष्ट करुन त्यांना लाभ देण्यात यावा अशी मागणी आमदार किशोर जोरगेवार यांनी राष्ट्रीय अनुसुचित जाती आयोगाचे कार्यवाहक अध्यक्ष अरुण हालदार यांना केली आहे.

०३ नोव्हेंबर ला मुंबई येथे राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोगाची आढावा बैठक पार पडली या बैठकीत आमदार किशोर जोरगेवार यांनी सदर मागणी केली आहे. या बैठकीला राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोगाचे सदस्या डॉ अन्जू बाला, सदस्य सुभाष रामनाथ पारधी, संचालक कौशिक कुमार, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे सचिव सुमंत भांगे यांच्यासह राज्यभरातील अनुसूचित जाती राखीव मतदार संघातून निवडून आलेल्या खासदार आणि आमदारांची उपस्थिती होती.अनुसूचित जाती व नवबौद्ध कुटुंबाचे राहणीमान उंचवावे व त्यांच्या निवाऱ्याचा प्रश्न सुटावा यासाठी ग्रामीण व शहरी भागामध्ये रमाई आवास योजना अस्तित्वात आहे. परंतु चंद्रपूर महानगरपालिका क्षेत्रात काही अनुसूचित



जाती बांधवाना पंतप्रधान घरकुल आवास योजना अंतर्गत घरकुल मंजूर झाले आहे. मात्र पंतप्रधान घरकुल आवास योजनेत लाभार्थ्यांजवळ स्वमालकीच्या पट्ट्याची जागा असणे आवश्यक आहे. परंतु चंद्रपूर महानगरपालिका क्षेत्रात मागील ४ दशकापासून बहुतांश नागरीक हे महसूल व वेकोलि च्या जागेवर कच्चे घर बांधून राहत आहे. त्यामुळे त्यांच्याकडे घरपट्टे नाही परिणामी पंतप्रधान घरकुल आवास योजनेअंतर्गत घरकुल मंजूर झाले असले तरी त्यांना सदर योजेनाचा लाभ घेण्यास अडचण येत आहे. या समस्येचे निराकरण करण्यासाठी पंतप्रधान घरकुल आवास योजना अंतर्गत नाव असलेल्या अनुसूचित जाती प्रवर्ग बांधवाना रमाई आवास योजनेत समाविष्ट करून त्यांना घरकुल योजनेचा लाभ देण्यात यावा अशी मागणी आमदार किशोर जोरगेवार यांनी यावेळी केली आहे. सदर मागणीचे निवेदनही त्यांच्या वतीने देण्यात आले आहे. सोबतच सदर प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळविण्यातही अडचणी येत आहे. याकडेही आयोगाने लक्ष देण्याची मागणी यावेळी आमदार किशोर जोरगेवार यांनी केली आहे.

## घुग्गुस येथील भूस्खलनाचा धोका असलेल्या १६० कुटुंबाचे होणार पुनर्वसन

### पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या प्रयत्नामुळे सहा एकर जागा उपलब्ध

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

वेकोलिच्या खाणींमुळे भूस्खलनाचा धोका असलेल्या घुग्गुस येथील १६० कुटुंबाचे नवीन जागेवर पुनर्वसन होणार आहे. या कुटुंबीयांना निवाऱ्यासह सर्व मूलभूत सोयी-सुविधा देण्यासाठी सहा एकर जागा उपलब्ध करून देण्यात आली आहे. विशेष म्हणजे नवीन जागेवर या कुटुंबीयांच्या पुनर्वसनासाठी राज्याचे वन, सांस्कृतिक कार्य व मत्स्य व्यवसाय मंत्री तथा पालकमंत्री ना. सुधीर मुनगंटीवार हे सुरुवातीपासूनच आग्रही होते. याबाबत त्यांनी शासनाकडे सातत्याने पाठपुरावा केला. अखेर त्यांच्या पाठपुराव्याला मोठे यश प्राप्त झाले आहे.

चंद्रपूर जिल्ह्यातील घुग्गुस येथील आमराई वॉर्डात २६ ऑगस्ट २०२२ रोजी गजानन मडावी यांचे घर भूस्खलनामुळे ६० ते ७० फूट जमिनीत गेले. या घटनेची पालकमंत्री ना. सुधीर मुनगंटीवार यांनी तात्काळ दखल घेत प्रशासकीय अधिकाऱ्यांसोबत घटनास्थळाला भेट दिली. वेकोलिच्या खाणींमुळे परिसरातील इतर १६० घरांनासुध्दा भूस्खलनाचा धोका असल्याचं त्यांच्या निदर्शनास आले. तेव्हापासूनच या सर्व



कुटुंबांचे इतर जागेवर पुनर्वसन करण्यासाठी पालकमंत्री ना. मुनगंटीवार यांनी शासनाकडे सातत्याने पाठपुरावा केला होता.त्यानुसार मौजा घुग्गुस येथील शासकीय जमीन स.न. २९/१, आराजी ५९.४७ हे. आर. जागेपैकी २.४० हे. आर. (६ एकर) जागा या १६० कुटुंबांच्या निवाऱ्यासाठी उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्यांचे योग्य पुनर्वसनाकरीता भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना अधिनियम २०१३ मधील तरतुदीनुसार तसेच महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम ३०, ३१ व ४० आणि महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनीची विल्हेवाट लावणे) नियम १९७१ चे नियम ४२ (१) (अ) व नियम ४५ अन्वये घुग्गुस नगर परिषदेचे मुख्याधिकारी यांना जमीन उपलब्ध करून देण्याबाबत शासनाची मान्यता देण्यात आली आहे.घुग्गुस येथील आमराई वॉर्डात झालेल्या भूस्खलनाच्या घटनेची तात्काळ नोंद राज्याचे वन, सांस्कृतिक कार्य मंत्री ना.श्री. सुधीर मुनगंटीवार यांनी घेऊन घटनास्थळाला भेट दिली. यावेळी त्यांनी भूस्खलनाचा धोका असलेल्या घरांना मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून तात्काळ १० हजार रुपये देण्यात येईल, असा शब्द पीडित कुटुंबाना दिला होता. भूस्खलनाच्या दुर्घटनेप्रकरणी बाधित झालेल्या १६० कुटुंबांसाठी पालकमंत्री ना.मुनगंटीवार यांनी केवळ दहा दिवसांत मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून १६ लक्ष रुपये मंजूर करून आणले होते. सदर रक्कम जिल्हाधिकारी चंद्रपूर यांच्याकडे वर्ग करण्यात आली व मंजूर अर्थसहाय्यातून प्रत्येक कुटुंब प्रमुखाला १० हजार रुपये याप्रमाणे १६ लक्ष रुपये तातडीने वाटप करण्यात आले होते.

# संपादकीय

## दुष्काळाच्या झळा



दुष्काळामुळे होरपळ महाराष्ट्राच्या पाचवीला पुजलेली आहे. तीन वर्षांपूर्वी ओल्या दुष्काळाची मागणी करणाऱ्या राज्याचा काही भाग आता 'एल निनो'च्या परिणामामुळे दुष्काळाच्या छायेत आहे. वरुणराजाने पाठ फिरवल्याने जून कोरडा गेला. जुलैमध्ये त्यातल्या त्यात बरा आणि ऑगस्ट, सप्टेंबर अशा दोन्हीही महिन्यांत नीचांकी पाऊसमान असे एकूण यावर्षीच्या पावसाळ्याचे ढोबळ चित्र आहे.परतीचा पाऊस राज्यातील काही भागांना दिलासा देत, जलसिंचन करत जातो. यावेळी त्यानेही दिलासा दिलेला नाही. खरिपाचा हंगाम संपत आला आहे, बहुतांश ठिकाणी सरासरीच्या वीस-पंचवीस टक्के पिकांच्या उत्पादनात तूट आहे. मराठवाडा, विदर्भ तसेच खानदेशच्या काही भागांत दुबार पेरण्या करूनही शेतकऱ्यांच्या पदरी निराशा आहे. थोडक्यात, यावर्षी महाराष्ट्राला दुष्काळाच्या अरिष्टाला तोंड देण्यासाठी सज्ज राहावे लागेल.पुणे जिल्ह्यातील सात आणि सांगली, जालना व सोलापूर या जिल्ह्यांतील प्रत्येकी पाच तालुके यांच्यासह राज्यातील सुमारे चाळीस तालुके दुष्काळासारख्या टंचाईला आणि परिस्थितीला तोंड देत आहेत. राज्याचा मदत व पुनर्वसन विभाग आणि पाठोपाठ कृषी विभाग यांनी त्या तालुक्यांना दुष्काळी जाहीर करण्यासाठीची कागदोपत्री कार्यवाही चालवली आहे. येत्या काही दिवसांत तशी घोषणाही कदाचित होईल. तथापि, या चाळीस तालुक्यांशिवाय राज्यातील अन्य १९४ तालुकेही दुष्काळसदृश स्थितीला तोंड देत आहेत.आगामी काळात पाऊसमान किती राहील, याचा अंदाज सध्यातरी लावणे अशक्य आहे. सिंचनाच्या अपुऱ्या सुविधा आणि थंडीचे प्रमाणही जेमतेम राहिल्यास रब्बीचा बार फुसका ठरू शकतो. तसे झाल्यास राज्यातील शेती व शेतकऱ्यांच्या दैनंदिन जीवनावर विपरित आणि दूरगामी परिणाम होतील.विशेषतः सातत्याने दुष्काळी स्थितीला तोंड देणाऱ्या मराठवाडा, विदर्भासारख्या भागात मुळातच विविध समस्यांनी हवालदिल शेतकऱ्यांच्या दैनेत भर पडेल. एवढेच नव्हे तर ज्या शेतीने गेली काही वर्षे ढोबळ उत्पादनात मोलाची भर घातली, त्याच शेतीउद्योगाला मदतीचा हात देण्यासाठी सरकारी यंत्रणेला सज्जता करावी लागेल. दुष्काळ जाहीर होणे म्हणजे सरकारी तिजोरी खुली करणे. दुष्काळाबाबतचे निकष वेळोवेळी सुधारित झाले आहेत.पैसेवारी, पाऊसमान, पेरणीखालील क्षेत्र आणि प्रत्यक्षात हाती आलेले पीक अशा कितीतरी निकषांच्या मोजपट्टीतून दुष्काळाचे शिक्कामोर्तब होईल. त्यामुळे किमान शेतकऱ्यांकडे कर्जवसुलीचा तगादा लागणार नाही, कर्जाची फेररचना होईल, त्यांच्या मुलांना शुल्कमाफीसह इतर सवलती मिळतील, रोजगार हमीचे निकष शिथिल होतील.परंतु एवढे करूनही त्याच्या सामाजिक आणि आर्थिक व्यवहाराची विस्कटलेली घडी पूर्वपदावर येईल, असे नाही. त्याने खासगी सावकाराकडून कर्ज, उचल घेतलेली असते. कृषीनिविष्ठा विक्रेत्यांकडून शेतीपूरक साहित्य घेतलेले असते. अशा कितीतरी बाबींची पूर्तता हा मोठा प्रश्न आहे. त्यामुळे सरकारने दुष्काळाबाबत पाहणी करणे, कागदोपत्री बाबींची पूर्तता करणे असे सोपस्कार पार पाडून दिवाळीपूर्वी त्याची घोषणा करावी.त्याचबरोबर तोंडावर असलेला रब्बी हंगाम लक्षात घेऊन त्यासाठी बी-बियाणे, खते, कीटकनाशके, तणनाशके यांचा पुरवठा, त्याचे वितरण करून दुष्काळसदृश स्थितीला तोंड देणाऱ्या शेतकऱ्याला चौकटीपलीकडे जाऊन मदतीचा हात देता येईल का, हे पाहण्याची गरज आहे. पाणी आणि चारा यांचा मुबलक पुरवठा अगत्याचा असतो. भूजलपातळी नीचांकी स्तराकडे निघाली आहे. त्यामुळे पाण्यावरून संघर्ष तापू लागल्याची चिन्हे आहेत.पिण्यासाठी, औद्योगिक आणि शेती यांच्यासाठीच्या पाणीवाटपाचे नियोजन आणि कार्यवाही हा आगामी काळात कळीचा मुद्दा होणार आहे. पाण्यासाठी वणवण आणि टँकरची घरघर डिसेंबरपासून वाढू लागेल. शहरांतूनही पाण्याचा काटेकोर वापर व्हावा. रोजगार हमी, 'मनरेगा' यासारख्या योजनांतून कामांचे नियोजन नीट व्हायला हवे. पुढच्या काळात अन्य स्वरूपाचे स्थलांतर वाढेल. शहराकडे येणारा लोंढा नवनव्या समस्या घेऊन येतो.हे पारंपरिक चित्र बदलण्यासाठी उपाययोजना कराव्यात. चाराछावण्यांच्या उभारणीचे नियोजन करावे. उसाच्या दरासाठी शेतकरी संघटना आक्रमक पवित्रा घेत आहेत. तथापि, उन्हाचा तडाखा, पाणीपुरवठ्याच्या मर्यादा, उसाची तोड आदींचा उत्पादनावर विपरित परिणाम होईल. वर्ष-दोन वर्षांपूर्वी जूनपर्यंत हंगाम चालवावे लागत होते, यावेळी ते विहीत वेळेआधी गुंडाळावे लागतील, अशी चिन्हे आहेत.फळबागायतीतील आघाडी टिकवणे हेही आव्हानात्मक असेल. त्यामुळे ग्रामीण अर्थकारणाला ब्रेक लागू शकतो. जूनपासून दुष्काळाची चर्चा असली तरी राज्यातील सर्वच पक्ष शह-काटशह, कुरघोडी, एकमेकांना मात देणे यामध्येच आत्ममग्न झाल्याने त्यांना शेतकऱ्यांच्या प्रश्नाकडे लक्ष द्यायला सवड नाही. राज्यकर्त्यांची भाषा दुष्काळाबाबत चर्चा, आवाहनापलीकडे जात नाही.बांधावर जाऊन वस्तुस्थिती जाणण्यासाठीची इच्छाशक्तीही दिसत नाही. आगामी वर्ष लोकसभा, विधानसभांसह स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांनी ढवळून निघेल. अशावेळी ग्रामीण जनतेच्या प्रश्नांची तड आणि समस्यांवर उत्तरांचा उतारा दिला नाही, तर त्याची किंमत मोजावी लागू शकते.

# शमी, सि'राज' ची मुंबईत एकहाती सत्ता

डॉ.अनिल पावशेकर
मो.९८२२९३९२८७

आयसीसी विश्वचषकात टीम इंडियाची तुफानी घोडदौड कायम असून सातव्या लढतीत त्यांनी लंकेला अक्षरशः पायदळी तुडवले आहे. विजयाचा सत्ते पे सत्ता ठोकत टीम इंडियाने सेमीफायनलचे बुकींग कन्फर्म केले आहे. शुभमन, विराट, श्रेयसच्या घणाघाती फलंदाजीने लंकेच्या गोलंदाजीचे वाभाडे काढले तर बुमराह, सिराज, शमीच्या वादळात लंकेच्या फलंदाजीचा पालापाचोळा झाला. मुख्य म्हणजे या महत्त्वाच्या सामन्यात लंकेला काही चुकीच्या निर्णयांचा आणि गचाळ क्षेत्ररक्षणाचा चांगलाच फटका बसला आहे.झाले काय तर मुंबईत धावांचा पाऊस पडणार हे अपेक्षितच होते. त्यात लंकेने नाणेफेक जिंकून टीम इंडियाला फलंदाजी देत आ बैल मुझे मार करून घेतले. कारण सध्या नभात जरी शरदाचे चांदणे लखलखत असले तरी आपल्या फलंदाजीचे तारें जमीं वर बहरून आले आहे. अगदी दुसऱ्या चेंडूवर रोहीत बाद होऊनही साडेतीनशे चा टप्पा सहज ओलांडल्या गेला. मुख्य म्हणजे लंकेच्या गोलंदाजांनी ताज्या खेळपट्टीवर प्रारंभी सुरेख मारा करत शुभमन विराटला चांगलेच भंडावून सोडले होते. भरीस भर म्हणून लंकन खेळाडूंनी प्री दिवाळी ऑफर देत एक कॅच वर एक कॅच फ्री सोडत आपल्या पायावर धोंडा पाडून घेतला.इतर फलंदाजांचे सोडा, विराटला जीवदान देऊन कांगारुंनी जी चुकी केली तिच लंकेने केली. विराट स्वतःच्या धावा तर वाढवतोच परंतु संघाचा डाव सावरत त्याला सुंदर आकार सुद्धा देतो. एकदा झेल सुटल्यावर विराटने पुन्हा हवेत फटके न मारून आपले कमिटमेंट दाखवून दिले. त्याने शुभमन सोबत १८९ धावांची मोठ्ठी भागिदारी करत लंकन गोलंदाजांना जेरीस आणले. हे दोघेही शंभरी गाठतील असे वाटतानाच मधुशंकाने दोघांचा बळी घेतला. खरेतर रोहीतला बाद करत त्याने लंकेला झक्कास सुरुवात करून दिली होती. दुसऱ्या टोकाला चमीरा त्याला उत्तम साथ देत होता. पण या दोघांनाही कुशल मेंडीस ने आक्रमणातून लवकर काढत फार मोठी चुक केली. कदाचित या दोघांना आणखी काही षटके दिली असती तर शुभमन, विराट वर दबाव वाढला असता.शुभमन, विराट तंबूत परतताच डावाची सर्व सुत्रे हाती घेत श्रेयस अय्यर ने फलंदाजीतला आपला बॅकलॉग पूर्ण केला. त्याने सणसणीत सहा षटकार आणि तीन चौकार ठोकत त्याच्यातला टायगर अभी जिंदा है हे दाखवून दिले. गील, कोहलीच्या प्रयत्नांना सुवर्ण कळस चढविण्याचे बहुमूल्य काम श्रेयसने केले. त्याने राहुल आणि जडेजा सोबत दोन अर्धशतकी भागिदाऱ्या करत आपली धावसंख्या गुटगुटीत केली. वास्तविकत: हा आकडा आणखी फुगला असता मात्र मधुशंकाने हाताने कमी आणि डोक्याने जास्त गोलंदाजी करत आपल्या धावसंख्येला थोडेफार वेसण घातले. त्याचे ते ऑफकटर, स्लोअर वन आणि स्लो बाऊंसर आपल्या दिग्गज फलंदाजांना चकवून गेले. त्यातही त्याने गील, विराट आणि श्रेयसला ज्या खुबीने बाद केले ते पाहता त्याला फलंदाजांना नव्वदीत बाद करायचे पेटंट नक्कीच मिळू शकते.लंकेची फलंदाजी पाहता साडेतीनशेच्या वरचे लक्ष्य म्हणजे त्यांच्या साठी दिल्ली (कोलोंबो) बहोत दूर है सारखे होते. शिवाय बुमराह,सिराज आणि शमीचे त्रिकुट ज्याप्रकारे आग ओकत आहे ते पाहता हा गोवर्धन ते पेलू शकणार नाही हे निश्चित होते. तरीपण ते एक सभ्य, सुसंस्कृत प्रतिकार करतील असा अंदाज होता. मात्र झाले उलटेच. आपल्या वेगवान तिकडीने त्यांना पळता भुई थोडी केली. स्विंग, सिम आणि पेसच्या वावटळीत हाय काय नाय काय करत लंकेचा फलंदाजीचा हवामहल सफाचट झाला. कोण फलंदाजीला येत आहे, कोण बाद होत आहे, काही कळतच नव्हतं. बुमराहने पहिल्याच चेंडूवर त्यांचे नाक दाबल्याने सिराज, शमीसाठी त्यांनी तोंड उघडे करून टाकले. जणुकाही आशिया चषकातील सिराजच्या गोलंदाजीचा रिप्ले पाहत आहोत असे वाटत होते.सिराजने त्याच्या पहिल्या दोन षटकांत तीन फलंदाजांना बाद करत लंकेचे कंबरडे मोडून काढले. सोबतच लायसन्स टू किल असलेल्या शमीने बेछूट गोळीबार करत लंकेच्या उरल्यासुरल्या आशा आकांक्षांना मुठमाती दिली. आपल्या वेगवान गोलंदाजांना तोंड देऊ शकेल असं एकही नांव, फलंदाज लंकेकडे नव्हता. शमीने पाच फलंदाजांना केवळ बाद केले असे नव्हे तर स्विंग चीज क्या है आप मेरी जान लिजीए याचे प्रात्यक्षिक करून दाखविले. दुर्दैवाने लंकेकडे आपल्या त्रिकुटांचे मिसाईल थोपवण्याची डोम यंत्रणा नव्हती. त्यांची वाताहत कोणीही थांबवू शकले नाही. लंकन समर्थकांची अवस्था तर इस दिल के टुकडे हजार हुए, कोई यहाँ गिरा कोई वहां गिरा सारखी होती.टीम इंडियाचे चाहते मात्र या विजयाने गदगदून गेले आहेत. या विजयाने सेमीफायनलच्या घाटात, टीम इंडिया थाटात पोहोचली आहे. निव्वळ फलंदाजी अथवा गोलंदाजी नव्हे तर क्षेत्ररक्षकांनी सुद्धा सुंदर झेल टिपत आपली कामगिरी चोख बजावली आहे. तरीपण या स्पर्धेत ज्या प्रकारे आपले गोलंदाज लाईन, लेंथ ची लय टिकवून आहेत आणि सातत्याने बळी घेत आहेत ते पाहता ते आपल्या फलंदाजांपेक्षा काकणभर सरस आहेत असे वाटते. सिराज, शमी बळी मिळवत असतांना सुद्धा रोहीतने त्यांना आणखी न थकवता, त्यांच्या वैयक्तिक विक्रमाच्या नादी न लागता गोलंदाजीत बदल करत आपल्या नेतृत्व गुणांची चुणूक दाखवली आहे. पूर्वी आपण फलंदाजीच्या दादागिरीने जिंकत होतो. प्रथमच आपल्या गोलंदाजांनी प्रतिस्पर्ध्यांच्या उरात धडकी भरवली आहे. थोडक्यात काय तर फलंदाज, गोलंदाज आणि क्षेत्ररक्षकांनी मिले सूर मेरा तुम्हारा केल्याने टीम इंडियाचा वारू चौखुर उधळला आहे. सध्यातरी टीम इंडिया अनस्टॉपेबल असून एकमेव द.आफ्रिकेचा संघ आपल्याला टक्कर द्यायच्या स्थितीत दिसून येत आहे.

# विचारांचे पितळ!

विविध मेळाव्यांमधून समोर आलेले राजकारणाचे चित्र विषण्ण करणारे आहे. ते दिवसेंदिवस अधिकाधिक पोकळ होत चालले आहे.लोकसभा निवडणूक चार महिन्यांवर येऊन ठेपली, त्यानंतरच्या पाच महिन्यांत होणारी राज्य विधानसभा निवडणूक आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची प्रतीक्षा, या पार्श्वभूमीवर यंदाचा दसरा हा सर्वसामान्य जनतेला हुलकावण्या देणारा ठरला!शिवसेनेत मोठी फूट पाडून एकनाथ शिंदे यांनी मुख्यमंत्रिपद मिळविल्यानंतर गेल्या वर्षी 'विचारांचे सोने' लुटणारे दोन मेळावे झाले होते. यंदाही तोच खेळ मुंबईत रंगला, तर तिकडे बीड जिल्ह्यातील सावरगाव येथे पंकजा मुंडे यांचाही मेळावा झाला. या तिन्ही मेळाव्यांचे वर्णन दोन शब्दांत करावयाचे झाले तर त्या 'दुरुत्तर सभा' होत्या, असेच खेदाने म्हणावे लागते!

या सगळ्यांतून नेमके विचारांचे किती सुवर्णकण हाती लागले, हा प्रश्नच आहे. मुळात आपल्या राजकीय प्रतिस्पर्ध्यांना कोंडीत पकडणे, हिशेब चुकते करणे, शेरेबाजी यातच ही सगळी ऊर्जा खर्च होत असेल तर सर्वसामान्य माणूस तेथे फक्त ही उणीदुणी ऐकायला गोळा झाला होता का, असा प्रश्न पडतो.मराठा आरक्षणाच्या प्रश्नावरून उद्धव ठाकरे यांनी महाराष्ट्रातील सरकारची कोंडी करण्याचा प्रयत्न केला, तर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नंतरच्या काही मिनिटांतच थेट छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावाने आणाभाका घेत, आपण हे आरक्षण देण्यास बांधील असल्याची ग्वाही दिली. उद्धव ठाकरे यांनी 'खोकासुरा'चे निर्दालन करण्याची आण आपल्या पाठीराख्यांना घातली.

पंकजा मुंडे यांनी मात्र काहीसा वेगळा सूर लावत 'गेले काही दिवस मी वेगळा पर्याय शोधत आहे!' असे वक्तव्य करून भारतीय जनता पक्षाच्या राज्यनेतृत्वाला धमकी दिली. अर्थात, ती फुकाचीच ठरणार; याचे कारण गेले काही वर्षे त्या हा पर्याय शोधत आहेत. पंकजा मुंडे या आपल्या भाषणात काहीशा बावचळून गेलेल्या दिसत असल्या तरी 'सर्वांना सोबत घेणारे नेतृत्व हवे,' हे त्यांचे उद्गार थेट देवेंद्र फडणवीस यांना टोला लगावणारे होते.यंदाच्या दसऱ्याचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे शरद पवार यांनीही पुण्यात विचारांचे सोने लुटण्याची संधी



आपल्या कार्यकर्त्यांना दिली! रोहित पवार यांच्या 'संघर्ष यात्रे'ला हिरवा झेंडा दाखवताना राज्य सरकारला लक्ष्य केले. ते अपेक्षितच होते. दसऱ्यालाच झालेल्या आणखी दोन कार्यक्रमांचा उल्लेख केला पाहिजे. त्यांमध्ये आगामी लोकसभा निवडणुकीचा अजेंडाच स्पष्टपणे समोर आणला गेला, असे म्हणता येईल.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दसऱ्यानिमित्त आयोजित कार्यक्रमात अयोध्येत पूर्ण होत आलेल्या राम मंदिरात 'रामलल्ला'च्या जानेवारीतील प्राणप्रतिष्ठेचा उल्लेख केला. सरसंघचालक मोहनराव भागवत यांच्या भाषणातही अयोध्येतील राममंदिराचा उल्लेख होता. भागवत यांनी प्राणप्रतिष्ठेच्या दिवशी सर्वांनाच अयोध्येत जाणे शक्य होणार नसल्याने आपापल्या गावांतील राम मंदिरांत कार्यक्रम आयोजित करण्याचे आवाहन केले.तर मोदी यांनीही इतर अनेक बाबींचा उल्लेख करताना, अनेक वर्षांच्या प्रतीक्षेनंतर राम मंदिर उभारले जाताना पाहणे, हे आपले सुदैवच असल्याचे सांगितले. याचा अर्थ स्पष्ट आहे. संघ परिवार आणि भाजप येत्या एप्रिल-मे महिन्यांत होणाऱ्या लोकसभा निवडणुकीत 'अयोध्येत साकार झालेले राम मंदिर' हाच आपला मुख्य मुद्दा करणार, असेच चित्र या विजयादशमीला उभे राहिले आहे.'समाजात फूट पाडणाऱ्यांपासून सावध राहण्याचे' आवाहन भागवत यांनी जनतेला केले खरे; मात्र ते करताना आपले लक्ष्य नेमके कोण आहे, हे त्यांनी स्पष्ट न केल्यामुळे चर्चांना उधाण आले आहे.अर्थात महाराष्ट्रात तरी इलेक्ट्रॉनिक मीडियाचे लक्ष शिवसेनेच्याच दोन मेळाव्यांकडे लागले होते, यात शंका नाही. त्याचे प्रमुख कारण म्हणजे ही 'इव्हेंटबाजी' तर होतीच; शिवाय कोणता गट अधिक गर्दी जमवतो, याबाबत कमालीची उत्सुकता होती. त्यामुळेच यंदा प्रथमच येणाऱ्या झुंडींना मेळाव्यानंतर जेवणाचीही व्यवस्था अधिकृतपणे करण्यात आली होती! या दोन्ही मेळाव्यांत एकमेकांचा उद्धार करण्यापलीकडे झाली ती फक्त भावनिक आवाहने.'उद्धव हे बाळासाहेबांच्या विचारांशी प्रतारणा करणारे 'महागद्दार' आहेत!' असा आरोप शिंदे यांनी केला असला, तरी 'खरे 'गद्दार' कोण आहेत, हे जनता ओळखून आहे', असे सांगत उद्धव ठाकरे यांनी 'हिंमत असेल, तर निवडणुका घ्या' असे आव्हानच शिंदे सरकारला दिले. शिवाय, मराठा आरक्षणाचा प्रश्न हा राज्य पातळीवर सुटणे शक्य नसून, तो निर्णय संसदेतच व्हावा लागेल, अशी स्पष्टोक्तीही केली.त्यापलीकडे या जमलेल्या आणि मुख्य म्हणजे मुंबईबाहेरून आलेल्या लोकांना त्यात 'मुंबईदर्शना'पलीकडे कितपत स्वारस्य होते, याबाबतही शंका घेता येते. शेतीपासून बेरोजगारीपर्यंत अनेक प्रश्नांनी राज्याला ग्रासलेले असताना, हे दोन बडे नेते एकमेकांना शिव्याशाप देण्याशिवाय काही बोलत नव्हते. हे असेच सुरू राहिले तर या मेळाव्यांसाठी यापुढे उत्स्फूर्तपणे किती लोक येतील, हा प्रश्नच आहे.या साऱ्याच मेळाव्यांमधून समोर आलेले राजकारणाचे चित्र विषण्ण करणारे आहे. ते दिवसेंदिवस अधिकाधिक पोकळ होत चालले आहे. राजकीय नेत्यांमध्ये स्पर्धा जरूर असली पाहिजे. संसदीय लोकशाही मुळात त्या स्पर्धेवरच आधारित आहे. पण त्या स्पर्धेचा लाभ सर्वसामान्य माणसाला व्हावा, अशी अपेक्षा आहे. इथे चढाओढ राजकारण्यांमध्ये असली तरी लोक फक्त तोंडी लावण्यापुरतेच आणि 'साक्षीदार' या भूमिकेपुरते दिसतात. त्यामुळेच दसऱ्याला ठिकठिकाणी भाषणांचा पाऊस पडला; पण लोक कोरडेच राहिले.

# संत विचारांचा चक्रवर्ती

वारकरी संप्रदायाचे अध्वर्यू , संताच्या परतत्व विचाराचा सर्वसामान्यांना सुवर्णस्पर्श कीर्तनकार ह.भ.प बाबामहाराज सातारकर यांची प्रणज्योत आज मालवली. देशात आणि विदेशात संताचा विचार लोकप्रिय करणाऱ्या बाबामहाराज सातारकर यांच्यावर प्रा. डॉ. प्रकाश खांडगे यांनी विशेष लेख लिहिला आहे.

प्रा. डॉ. प्रकाश खांडगे: वारकरी संप्रदायाचे अध्वर्यू, संतांच्या परतत्वविचाराचा सर्वसामान्यांना सुवर्णस्पर्श घडविणारे प्रासादिक कीर्तनकार-प्रवचनकार हरिभक्त परायण बाबामहाराज सातारकर यांची प्राणज्योत अखेर आज (२६ ऑक्टोबर) मालवली. बाबामहाराज सातारकर यांनी संतांचा विचार मुखर केला. माझ्या वडिलांची मिराशी मिरविन गा देवा, या संतवचना प्रमाणे बाबामहाराज सातारकर यांनी आपल्या घरची वारकरी संप्रदायाची आणि परमार्थाची परंपरा पुढे चालवली. त्यांच्या मुखातून संत ज्ञानेश्वरांची ज्ञानेश्वरी खरोखरच ऐश्वर्यवती झाली. मुंबई दूरदर्शनच्या सह्याद्री वाहिनीवर त्यांची 'अभंगवाणी' गाजली. त्यांच्या कीर्तनाचा भावार्थ आणि त्यांच्या कीर्तनाचे निरूपण त्यांच्या सुस्वर आवाजात रसाळ वाटत असे. कर्णमधुर वाटत असे. राज्यात, देशात आणि विदेशात त्यांनी संतांचा विचार लोकप्रिय केला.बाबामहाराजांचा जन्म सातारचा. त्यांच्या घराण्यात वारकरी संप्रदायाची तब्बल १३५ वर्षांची परंपरा होती. त्यांच्या वडिलांचं नाव ज्ञानेश्वर दादामहाराज गोरे. ते प्रसिद्ध मृदंगवादक होते. तर बाबामहाराजांच्या मातोश्रींना संतवाङ्मयाची आवड होती. मात्र बाबामहाराजांना परमार्थाचे धड़े दिले ते त्यांच्या दोन चुलत्यांनी- आप्पामहाराज आणि अण्णामहाराज यांनी. बाबामहाराजांचं एस.एस.सी.पर्यंतचं शिक्षण इंग्रजी माध्यमातून झालेलं होतं. तसंच वयाच्या ११व्या वर्षापासूनच त्यांनी पं. पुरेहितबुवा आण आग्रा घराण्याचे लताफत हुसेन खाँसाहेब, असा मान्यवरांकडे शास्त्रीय गायनाचे धडे गिरवले होते. मात्र शास्त्रीय गायन शिकल्यावरही त्यांचा मूळ वारकरी कीर्तनातला रस कमी झाला नाही. उलट वयोपरत्वे तो वाढतच गेला.बाबामहाराज सातारकर यांची कीर्तनशैली अतिशय प्रसन्न होती. अंग हरिरूप करण्याचे सामर्थ्य त्या शैलीमध्ये होते. बाबामहाराज सातारकरांचा आणि माझा किमान ३० वर्षांपासूनचा परिचय. माझेही घराणे वारकरी असल्यामुळे बाबामहाराजांच्या घरी जाणे-येणे व्हायचे. त्यातूनच त्यांच्या कीर्तनाच्या ध्वनिमुद्रिका करण्याची कल्पना मला सुचली आणि त्यातून बाबामहाराजांच्या



सुमारे शंभरावर कॅसेट तयार झाल्या. संपूर्ण महाराष्ट्राने त्या मनोभावे ऐकल्या. बाबामहाराज सातारकर यांच्या हरिपाठाच्या कॅसेटने भाविकांना अक्षरशः चिरतंद्रा लागे. बाबामहाराजांच्या कीर्तनाचे वैशिष्ट्य म्हणजे पारंपरिक फडावरच्या चाली. फडावरच्या चालींचे एक वेगळे वैशिष्ट्य असते. बाबामहाराज फडावरच्या चाली जरी गात असत तरी त्या रागदारी थाटात बांधत असत बाबा. त्यामुळे एकाच वेळी ऐकायला रसाळ तरी बुद्धिगम्य असं त्यांचं कीर्तन असे.बाबामहाराजांनी आपल्या वडिलांकडून वादनाचं शिक्षण घेतलं होतं. त्यामुळे त्यांनी लयीचं नेमकं भान होतं. यामुळेच वयाच्या अवघ्या १२व्या वर्षी कीर्तनाला सुरुवात करूनही बाबामहाराजांच्या कीर्तनात पहिल्यापासूनच नेमकेपणा आणि भारदस्तपणा होता. घराण्यात कीर्तन-प्रवचाची परंपरा असल्यामुळे पुढच्या काळात बाबामहाराजांनी तोच मार्ग अनुसरला. कीर्तन-प्रवचन ऐकावं तर ते बाबामहाराजांचं हे समीकरण रूढ झाल्यामुळे संगीताचे संशोधक-अभ्यासक डॉ. अशोक रानडे यांनी त्यांची मुंबई दूरदर्शनवरील 'प्रतिभा आणि प्रतिमा' या कार्यक्रमात मुलाखतही घेतली होती. विविध दूरचित्रवाणी वाहिन्या. तसंच मुंबई दूरदर्शनवर त्यांच्या कैवल्याचा पुतळा, ज्ञानाची दिवाळी, तुका झालासे कळस, अनाथांचा नाथ, देवाचिये द्वारी... अशा अनेक प्रवचन मालिका सादर झाल्या.बाबामहाराजांनी कीर्तन-प्रवचनांचे अक्षरशः हजारो कार्यक्रम केले. सोबतच १९८० ते १९९९ या कालावधीत त्यांनी ठिकठिकाणी ज्ञानेश्वरीवर प्रवचने दिली. तर १९९८ ते २००१ या कालावधीत त्यांनी अमृतानुभवावर विवेचन केले. विशेष म्हणजे १९८३ पासून त्यांनी प्रत्येक वर्षी संतांच्या गावी कीर्तन सप्ताह आयोजित करण्याची परंपरा सुरू केली. त्यासाठी भंडारा डोंगर- देहू, त्र्यंबकेश्वर, नेवासे, पैठण, पंढरपूर, पिंपळनेर आदी ठिकाणी त्यांनी कीर्तन सप्ताहांचं आयोजन केलं. तसंच केवळ महाराष्ट्र, भारत एवढ्यापुरतंच त्यांचं कीर्तन-प्रवचन मर्यादित राहिलं नाही. पार लंडन-अमेरिकेत जाऊन तिथेही त्यांनी आपल्या रसाळ वाणीत कीर्तन-प्रवचन केलं आणि तिथल्याही बांधवा त्यांनी आपल्या वारकरी संप्रदायाशी जोडून घेतलं. विशेष म्हणजे केवळ कीर्तन-प्रवचन करून ते थांबले नाहीत. त्यांनी सुमारे १५ लाख व्यक्तींना वारकरी संप्रदायाची दीक्षा दिली आणि त्यांना व्यसनमुक्त केलं. या सामाजिक कामासाठी त्यांनी १९८३ साली 'श्री. चैतन्य अध्यात्मिक ज्ञान प्रसार संस्थे'ची स्थापना केली.बाबामहाराजांनी साधलेल्या या आध्यात्मिक-सामाजिक उन्नतीसाठी अलीकडेच महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागातर्फे बाबामहाराज सातारकर यांना 'ज्ञानोबा-तुकाराम' पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले होते. त्यावेळी त्यांच्या पत्नीचे निधन झाल्याने, पुरस्कार जाहीर समारंभात स्वीकारण्यास त्यांनी नम्र नकार दिला होता. त्यामुळे घरी जाऊन त्यांना हा पुरस्कार देण्यात आला.

सह्याद्रीचा राखणदार



# मुख्यमंत्री शिंदेंच्या काळात वर्षावर गुंडांना सहज प्रवेश:काँग्रेसचे प्रवक्ते अतुल लोंढेंचा हल्लाबोल

**मुंबई–**मुख्यमंत्र्यांचे सरकारी निवासस्थान 'वर्षा' बंगल्यावर सर्वसामान्य लोकांना प्रवेश मिळणे मुश्कील असते. वर्षावर प्रवेश देताना विविध पातळ्यांवर सुरक्षेची तपासणी केली जाते. पण मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या काळात वर्षावर गुंडांना सहज प्रवेश मिळत असल्याचे दिसते. सापांच्या विषाच्या रेव्ह पार्ट्या आयोजित करणाऱ्या एल्विश यादव सारख्या टुकार युट्युबरला विशेष आमंत्रण देऊन 'वर्षा'वरील गणपती आरतीला बोलावल्याचे उघड झाले आहे, असा गंभीर आरोप महाराष्ट्र काँग्रेसचे मुख्य प्रवक्ते अतुल लोंढे यांनी केला आहे.यासंदर्भात अतुल लोंढे पुढे म्हणाले की, 'विषारी रेव्ह पार्टी आयोजित केल्याप्रकरणी नोएडा पोलिसांनी एल्विश यादव व त्याच्या साथीदारांविरोधात गुन्हा नोंद केला असून त्यांच्याकडे जिवंत विषारी साप सापडले आहेत. नोएडाच्या पोलिसांना एल्विश यादव रेव्ह पार्ट्या आयोजित करतो याचा छडा लागला पण मुंबई अथवा महाराष्ट्र पोलिसांना एल्विशच्या काळ्या कृत्यांची माहिती नव्हते असे म्हणता येईल का? एल्विशची पार्श्वभूमी गुन्हेगारी प्रवृत्तीची असताना त्याची खबर पोलिसांनी नसावी व मुख्यमंत्र्यांच्या सरकारी निवास्थानी तो मुख्यमंत्र्यांचा पाहुणा म्हणून विशेष सन्मान दिला जातो हे आश्चर्यकारक आहे. एल्विश यादवला 'वर्षा'वर कोणाच्या सांगण्यावरून विशेष सन्मान मिळाला, हे महाराष्ट्राला समजले पाहिजे.''देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री असताना पुण्यातील कुख्यात गुंड बाबा बोडकेचे 'वर्षा' बंगल्यावरील फोटो झळकले होते. मुख्यमंत्र्यांच्या बंगल्यावरच गुंडांना विशेष पाहुणा म्हणून मान सन्मान मिळत असेल तर पोलिस विभाग तर काय करणार? पण हे अत्यंत गंभीर असून या प्रकरणी चौकशी झाली पाहिजे. मुख्यमंत्र्यांचा शासकीय 'वर्षा' बंगलाच जर गुंडांना 'अतिथि देवो भव' म्हणत असेल तर 'कुठे नेऊन ठेवलाय महाराष्ट्र माझा?' असाच प्रश्न पडतो' असेही अतुल लोंढे म्हणाले.हा एल्विश यादव. ....याच्यावर ड्रजशी संबंधित अनेक गुन्हे दाखल आहेत. विषारी सापांपासून ड्रग्स बनवून ते रेव्ह पार्ट्यांना पुरवण्याचे आरोप एल्विष वर आहेत राज्यामध्ये ठीक ठिकाणी ड्रग्सचे साठे, कारखाने आढळत आहेत. त्यात आमचा काही सहभागच नाही किंवा आमचा संबंधच नाही. अशा मखलाशा सरकारकडून रोज केल्या जात आहे. मग प्रश्न असा निर्माण होतो की हा एल्विश यादव मुख्यमंत्र्यांच्या शासकीय बंगल्यावर आरतीसाठी कसा बरे पोचला असेल.. ? असा सवाल सुषमा अंधारे यांनी केला आहे.



# रायगडमधील केमिकल कंपनीत आग

## पाच कामगार रुग्णालयात दाखल, तिघांची प्रकृती चिंताजनक

**रायगड–**रायगड जिल्ह्यातील महाडच्या एमआयडीसीतील केमिकल कंपनीत भीषण आग लागल्याची घटना समोर आली आहे. ही आग ब्लू जेट केमिकल कंपनीत लागली होती, या आगीत ११ कामगार अडकल्याची माहिती देण्यात आली आहे. तर कंपनीतील पाच कामगारांना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. जखमींपैकी तिघांची प्रकृती काहीशी चिंताजनक असल्याची माहिती आहे. वास्तविक गॅस गळतीमुळे आधी स्फोट झाला आणि त्या नंतर ही आग भडकल्याची प्राथमिक माहिती मिळाली आहे.ही केमिकल कंपनी असल्याने आग जास्त भडकली. सकाळी ११ वाजेच्या सुमारास ही आग लागल्याचे सांगण्यात येत आहे. घटनास्थळी अग्निशमन दल, पोलिस आणि महाड प्रशासनाचे अधिकारी दाखल झाले आहेत. आगीवर नियंत्रण मिळवण्याचे प्रयत्न करण्यात येत आहे.ब्लू जेट हेल्थकेअर लिमिटेड ही कंपनी रायगडमधील महाड एमआयडीसी मध्ये आहे. या कंपनीत सकाळी ११ च्या सुमारास स्फोट झाला. स्फोटाचा मोठा आवाज झाल्याने परिसरात भीतीचे वातावरण पसरले होते. स्फोटानंतर आग भडकली. त्यामुळे कंपनीमध्ये धावपळ सुरु झाली. यात आधी गॅस गळती झाली की आधी स्फोट झाला याबाबत अद्याप निश्चित माहिती मिळालेली नाही. मात्र स्फोट आणि गॅस गळती सुरु झाल्यानंतर, सर्वत्र आग पसरल्याचे प्रत्यक्ष दर्शीनीं सांगितले आहे.दरम्यान, महाड येथील कंपनीत झालेल्या या आग दुर्घटनेमध्ये ११ जण अजूनही अडकलेले असल्याची माहिती आहे. तर इतर पाच कर्मचाऱ्यांना उपचारासाठी हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले आहे. यापैकी तिघांची प्रकृती चिंताजनक असल्याचे रुग्णालय प्रशासनाच्या वतीने सांगण्यात आले आहे. आग लागली त्या वेळी या कंपनीमध्ये ५७ कामगार काम करत होते. रायगडचे पालकमंत्री उदय सामंत हे देखील घटनेवर लक्ष ठेऊन आहेत.



# उपोषण मागे घेतल्याबद्दल फडणवीसांनी मानले मनोज जरांगे पाटील यांचे आभार

**मुंबई–**मराठा समाजाच्या आरक्षणासाठी उपोषणाला बसलेले मनोज जरांगे पाटील यांनी उपोषण मागे घेतले आहे. त्या नंतर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मनोज जरांगे पाटील यांचे आभार व्यक्त केले आहे. मी राज्य सरकारच्या वतीने त्यांचे आभार मानतो, असे देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे. इतकेच नाही तर सरकारच्या वतीने मनोज जरांगे पाटील यांच्याशी चर्चा करण्यासाठी गेलेले माजी न्यायमूर्ती आणि मंत्र्यांचेही देवेंद्र फडणवीस यांनी आभार व्यक्त केले आहे. मनोज जरांगे पाटील यांनी उपोषण मागे घेतल्यानंतर फडणवीस यांनी ही पोस्ट शेअर केली आहे.

मराठा आरक्षणासाठी आंदोलनाला बसलेले मनोज जरांगे पाटील यांनी काही दिवसांपूर्वीच देवेंद्र फडणवीस यांचा एकेरी उल्लेख केला होता. त्यानंतर राज्य सरकारच्या वतीने मनोज जरांगे यांना फोनही गेला होता. त्यामुळे पुढील दोन ते तीन दिवस मी देवेंद्र फडणवीस यांचा एकेरी उल्लेख करणार नाही, असे मनोज जरांगे पाटील यांनी स्पष्ट केले होते. त्यानंतर काही दिवसांतच उपोषण मागे घेण्यात आले आहे. मात्र, या सर्व घडामोडींमध्ये मनोज जरांगे पाटील आणि देवेंद्र फडणवीस यांच्यात वादाची ठिणगी पडण्याची शक्यता वर्तवण्यात येत होती. मात्र, तसे झाले नाही. दरम्यान आता आंदोलनादरम्यान यातून मार्ग काढण्यात आला असून सरकारला दोन महिन्यांची मुदत देण्यात आली आहे. त्यामुळे सध्यातरी हा मुद्दा मागे पडला असल्याचे दिसून येत आहे.या संदर्भात देवेंद्र फडणवीस यांनी पोस्टच्या माध्यमातून आभार मानले आहेत. ते म्हणाले की, मराठा आरक्षणासाठी गेल्या ९ दिवसांपासून उपोषणाला बसलेले श्री मनोज जरांगे पाटील यांनी आपले उपोषण मागे घेतल्याबद्दल राज्य सरकारच्या वतीने मी त्यांचे आभार मानतो. या प्रक्रियेत माजी न्यायमूर्ती न्या. सुनील शुक्रे आणि न्या. मारोती गायकवाड यांनी राज्य सरकारला बहुमूल्य सहकार्य केले, मी त्यांचे विशेष आभार मानतो. माझ्या सर्व सहकारी मंत्री आणि लोकप्रतिनिधी यांचेही आभार !





# पुणे महापालिकेच्या ९३ रजा मुदत शिक्षकांची दिवाळी होणार गोड

**पुणे–**पुणे महापालिकेच्या प्राथमिक शाळेतील ९३ शिक्षण सेवकांची यंदाची दिवाळी गोड होणार असून, राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री तथा पुणे जिल्ह्याचे तत्कालीन पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या आदेशानुसार सर्व ९३ रजा मुदत शिक्षकांचे मानधन सहा हजारावरुन १६ हजार करण्यात आला आहे. यासंदर्भातील परिपत्रक महापालिकेने काढले आहे. ऐन दिवाळीच्या मोक्यावर मानधनवाढीचे परिपत्रक काढण्यात आल्याने शिक्षण सेवकांनी आनंद व्यक्त केला असून मंत्री पाटील यांचे आभार मानले आहेत.पुणे महापालिकेच्या प्राथमिक शाळेत गेली १४ वर्षे मानधनावर काम करणाऱ्या ९३ शिक्षणसेवकांना उच्च न्यायालयाने शिक्षण सेवेत कायम करुन वेतनश्रेणी लागू करण्याचे आदेश फेब्रुवारी २०२३ मध्ये दिले होते. यासाठी न्यायालयाने सहा आठवड्यांची मुदत दिली होती. मात्र, महापालिकेच्या शिक्षण विभागाने या आदेशावर कार्यवाही केलेली नव्हती.त्यामुळे सर्व शिक्षण सेवकांनी जून २०२३ मध्ये आंदोलनाचा पवित्रा घेत महापालिकेच्या विरोधात निदर्शने केली होती.यावेळी जिल्ह्याचे तत्कालिन पालकमंत्री आणि राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी मध्यस्थी करुन शिक्षण सेवकांना न्याय देण्याचे आश्वस्त केले होते. त्यांनी आयुक्त विक्रम कुमार यांच्याशी चर्चा करुन तत्काळ सर्व ९३ शिक्षण सेवकांना कायम करुन वेतन श्रेणी लागू करण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्यानुसार, महापालिकेने फेब्रुवारी २०२३ च्या शासन आदेशानुसार सर्व ९३ शिक्षण सेवकांना सहा हजारावरुन १६ हजार मानधन करण्याचा निर्णय घेतला असून त्याबाबतचे परिपत्रक आज जारी करण्यात आले. परिपत्रकाद्वारे वित्त विभागाला तातडीने वेतन आदा करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.



# श्रीराम मंदिर लोकार्पणानिमित्त विहिंपचे गृहसंपर्क अभियान:साडे दहा हजार गावांमध्ये घरोघरी अक्षता देऊन करणार आमंत्रित

**नागपूर–**२२ जानेवारी २०२४ रोजी अयोध्येत बहुप्रतिक्षित श्रीराम मंदिराचे लोकार्पण होणार असून त्या निमित्त विविध आयोजनाची योजना श्रीराम जन्मभूमी तीर्थक्षेत्र न्यासच्या वतीने संपूर्ण देशात करण्यात आली आहे. त्या पार्श्वभूमीवर ५ नोव्हेंबर रोजी देशभरातील २०० कार्यकर्त्यांना श्रीराम जन्मभूमी मंदिरात पूजीत अक्षता व प्रभू श्रीरामाचे छायाचित्र आणि माहिती पत्रक देण्यात येणार असल्याची माहिती महाराष्ट्र आणि गोवा प्रांताचे मंत्री गोविंद शेंडे यांनी येथे दिली.या अनुषंगाने विदर्भ प्रांतातून विहिंपचे विदर्भ प्रांत सहमंत्री अमोल अंधारे व यवतमाळ विभाग मंत्री राम लोखंडे हे दोन पदाधिकारी अक्षता घेण्यासाठी अयोध्येला जाणार आहेत. अयोद्धेतून आणलेल्या अक्षतांचे २७ नोव्हेंबर रोजी नागपुरातील प्रसिद्ध पोद्दारेश्वर राम मंदिर येथे विधिवत पूजन करून विदर्भातील सर्व जिल्हा प्रमुखांना देण्यात येतील. या अक्षता व श्रीरामाचे छायाचित्र व अभियानाचे माहिती पत्रक घेऊन १ ते १५ जानेवारी दरम्यान श्रीराम जन्मभूमी मंदिर निधी समर्पण अभियान दरम्यान संपर्क केल्या गेलेल्या साडेदहा हजार गावांमध्ये पंधरा लाख घरांपर्यंत संपर्क करीत मंदिर लोकार्पणाचे आमंत्रण देण्यात येणार आहे.अयोध्येतील मंदिर लोकार्पणाला सर्वांना जाणे शक्य नसल्या मुळे सर्वांनी माझे गाव, माझी अयोध्या' या संकल्पनेने मंदिर केंद्रित कार्यक्रम करीत आपल्या गाव, नगर, वस्तीत धार्मिक अनुष्ठान, नाम संकीर्तन, करीत स्थानिक मंदिरात महाआरती व प्रसाद वितरण करीत मंदिर लोकार्पणाचे थेट प्रक्षेपण मोठ्या स्क्रिनवर दाखवावे व त्यात सर्व नागरिकांना आमंत्रित करून आनंदोत्सव साजरा करावा या निमित्त परिसरात रांगोळ्या, घरांवर भगवे ध्वज व पताका लावून परिसर सुशोभित करावा तसेच सायंकाळी आपल्या घरासमोर किमान पाच दिवे प्रज्वलित करीत दीपोत्सव साजरा करण्याचे आवाहन विहिंपतर्फे मुंबई क्षेत्र मंत्री गोविंद शेंडे यांनी केले.अयोध्येत दर्शनाला येणाऱ्या भाविकांच्या सेवेसाठी विश्व हिंदू परिषद विदर्भ प्रांतातर्फे २० जानेवारी ते २० फेब्रुवारीपर्यंत अन्नछत्र चालवण्यात येणार असून त्यात लाखो भाविक दररोज सकाळी व संध्याकाळी महाप्रसादाचा लाभ घेणार आहेत. तसेच नागपुरातील ओम शिवशक्ती सेवा मंडळातर्फे याच दरम्यान अन्नछत्र तसेच नित्योपयोगी साहित्य पुरवठा सेवा देण्यात येणार आहे. या संपूर्ण आयोजनात सर्व रामभक्तांनी सहभागी व्हावे असे आवाहन करण्यात आले.या पत्रकार परिषदेला विश्व हिंदू परिषदेचे विदर्भ प्रांत अध्यक्ष राजेश्वर निवल, विदर्भ प्रांत मंत्री प्रशांत तितरे, प्रांत सह मंत्री अमोल अंधारे, विहिंप चे यवतमाळ विभाग मंत्री, राम लोखंडे, विदर्भ प्रांत प्रचार प्रसार प्रमुख निरंजन रिसालदार, विहिंप, नागपूर महानगर मंत्री अमोल ठाकरे उपस्थित होते.

# कृषी:प्रधानमंत्री पीक विमा योजनेत सहभागी होण्याचे कृषी विभागाचे आवाहन– कृषी संचालक दिलीप झेंडे



**पुणे–**चालू रब्बी हंगामामध्ये प्रधानमंत्री पीक विमा योजनेचा लाभ घेण्यासाठी ऑनलाईन पोर्टल कार्यान्वित करण्यात आले आहे. इच्छूक शेतकऱ्यांनी प्रधानमंत्री पीक विमा योजनेत सहभागी होण्यासाठी अर्ज करावेत, असे आवाहन कृषी संचालक दिलीप झेंडे यांनी केले आहे.योजनेमध्ये कर्जदार तसेच बिगर कर्जदार शेतकऱ्यांना सहभागी होता येईल. रब्बी ज्वारी या पिकासाठी ३० नोव्हेंबरपर्यंत तर गहू (बागायत), हरभरा, रब्बी कांदा या पिकांसाठी १५ डिसेंबर २०२३ पर्यंत अर्ज करता येतील. तसेच उन्हाळी भात व उन्हाळी भुईमूग या पिकासाठी ३१ मार्च २०२४४ पर्यंत शेतकऱ्यांना सहभाग घेता येईल.सन २०२३-२४ पासून 'सर्वसमावेशक पिक विमा योजना' राबविण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. त्यानुसार शेतकरी हिस्स्याची विमा हप्ता रक्कम राज्य शासनामार्फत भरण्यात येणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना केवळ १ रुपया भरुन http://pmfby.gov.in या पार्टलवर स्वत: शेतकरी, बँक, विमा कंपनी अथवा सामुहिक सेवा केंद्रामार्फत नोंदणी करता येईल.योजनेत सहभागाची नोंदणी करण्यासाठी सामुहिक सेवा केंद्र धारकाला विमा कंपनीमार्फत प्रत्येक अर्जासाठी ४० रुपये देण्यात येतात. त्यामुळे शेतकऱ्यांनी केवळ १ रुपया भरुन नोंदणी करावी. अतिरिक्त रकमेची मागणी केल्यास आपल्या संबंधित पीक विमा कंपनीचे कार्यालय, नजीकची बँक, तहसीलदार, तालुका कृषी अधिकारी, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयाशी संपर्क साधावा.पुणे, हिंगोली, अकोला, धुळे व उस्मानाबाद जिल्ह्यासाठी एचडीएफसी जनरल इन्शुरन्स.कं.लि., सातारा, अहमदनगर, नाशिक, चंद्रपूर, सोलापूर, जळगाव, जिल्ह्यासाठी ओरिएन्टल इन्शुरन्स कंपनी लि. या विमा कंपन्यांच्या माध्यमातून ही योजना राबविण्यात येत आहे.कर्जदार शेतकऱ्यांना योजनेत सहभागी होण्यासाठी कर्ज मंजूर करणाऱ्या बँकेमार्फत विहित नमुन्यात अर्ज सादर करणे आवश्यक आहे. योजनेत सहभाग घ्यायचा नसेल तर विहित मुदतीत बँकेस लेखी कळविणे आवश्यक आहे, असे कृषी विभागामार्फत सांगण्यात आले आहे.

# वीजग्राहकांच्या तत्पर सेवेतील हयगय खपवून घेणार नाही:संचालक संजय ताकसांडे यांचा इशारा



**पुणे–**सर्व वर्गवारीतील वीजग्राहकांना सेवेच्या निर्धारित कृती मानकांप्रमाणे सेवा देण्यासाठी महावितरण अतिशय गंभीर आहे. त्यानुसार सुरळीत वीजपुरवठा, नवीन वीजजोडणी, अचूक बिलिंग व तक्रारींचे निराकरण यामधील तत्परतेत हयगय खपवून घेतली जाणार नाही असा इशारा महावितरणचे संचालक संजय ताकसांडे यांनी आढावा बैठकीत दिला. पुणे परिमंडल अंतर्गत ग्राहकसेवांसह विविध मुद्द्यांवरील कामकाजाबाबत सर्व मंडल, विभाग व उपविभाग कार्यालयांचा 'प्रकाशभवन' येथे आढावा घेताना संचालक संजय ताकसांडे बोलत होते. यावेळी पुणे प्रादेशिक संचालक अंकुश नाळे, मुख्य अभियंता राजेंद्र पवार (पुणे परिमंडल) व संजय पाटील (देयके व महसूल) यांची प्रमुख उपस्थिती होती.ताकसांडे म्हणाले की, वीजग्राहकांना 'इज ऑफ लिव्हिंग'प्रमाणे सेवा देण्यास महावितरणने अतिशय गंभीरपणे प्रारंभ केला आहे. यामध्ये कर्मचाऱ्यांची तत्परता अतिशय महत्त्वाची आहे. प्रत्येक कर्मचाऱ्याने याची नोंद घ्यावी व त्याप्रमाणे ग्राहकांना सेवा देण्यात कोणतीही कुचराई करू नये. यासोबतच गेल्या काही दिवसांमध्ये वीजबिलांची थकबाकी वाढत असल्याचे दिसून येत आहे. ही गंभीर बाब आहे. त्यामुळे चालू वीजबिलांसह थकबाकीची १०० टक्के वसूली करण्याचे निर्देश त्यांनी यावेळी दिले. शेतीला दिवसा वीजपुरवठा करण्यासाठी राज्य शासनाने मुख्यमंत्री सौर कृषिवाहिनी योजना २.० ची वेगवान अंमलबजावणी सुरु केली आहे. पहिल्या टप्प्यात पुणे परिमंडलातील ५६ उपकेंद्रांची या योजनेसाठी निवड झाली असून येत्या १५ नोव्हेंबरपर्यंत ही सर्व उपकेंद्र अद्ययावत करणे, तांत्रिक दुरुस्ती व सुधारणा, स्थापत्य कामे, इतर सक्षमीकरणाचे विविध कामे युद्धपातळीवर पूर्ण करावेत.अचूक बिलिंगसाठी केलेल्या उपाययोजनांमुळे वीजग्राहकांच्या तक्रारींचे प्रमाण लक्षणीय कमी झाले आहे. परंतु प्रत्यक्षात वीजवापर मोठ्या प्रमाणात होत असताना अचूक रीडिंग अभावी किंवा सरासरी वीजबिलांद्वारे चुकीचे बिल देण्याचा प्रकार खपवून घेतला जाणार नाही. यासह बिलिंगबाबत ग्राहकांच्या तक्रारींचे विनाविलंब निराकरण करावे असेही ताकसांडे यांनी स्पष्ट करत म्हणाले,कृषिपंपाच्या नवीन वीजजोडण्यांसाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. कोटेशनची रक्कम भरलेल्या पुणे परिमंडलातील प्रलंबित कृषी वीजजोडण्या येत्या नोव्हेंबर अखेरपर्यंत कार्यान्वित कराव्यात. रब्बी हंगाम सुरु होत असल्याने कृषिपंपांना वीजपुरवठा करणारे नादुरुस्त तसेच जळालेले रोहित्र तातडीने बदलण्यासाठी अतिरिक्त रोहित्र तयार ठेवावेत.

सह्याद्रीचा राखणदार



# हंसराज अहीर व तालुका प्रशासनाच्या मध्यस्थीने परसोड्यातील आमरण उपोषण मागे

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

परसोडा लिज क्षेत्रातील शेतकऱ्यांच्या न्याय मागणीची आरसीसीपीएल कंपनीद्वारा अवहेलना होत आहे ही वस्तुस्थिती आहे. पेसा कायद्याचे सऱ्हासपणे उल्लंघन होत आहे. यापरीसरातील जमिनींचे सरसकट अधिग्रहण व्हावे अशी प्रमुख मागणी असतांना दलालांकरवी जमिनी घेवून कमिशनबाजीच्या माध्यमातून त्या कंपनीला विकल्या जात आहेत. हा या लिज क्षेत्रातील शेतकऱ्यांवर अन्याय असल्याने या प्रमुख मागणीसह अन्य महत्वपूर्ण मागण्यांसाठी नेमीचंद काटकर यांनी बेमुद्दत अन्नत्याग आमरण उपोषण दि. १६ ऑक्टोंबर पासुन सुरू केले होते. या आंदोलनाची दखल घेवून दि. ०२ नोव्हे. २०२३ रोजी जोपर्यंत सरसकट अधिग्रहणाचा निर्णय होत नाही तोपर्यंत उत्खनन थांबविण्याचा निर्णय जिल्हाप्रशासनाने घेतल्याने हे उपोषण हंसराज अहीर यांच्या पुढाकाराने मागे घेण्यात आले असले तरी जोपर्यंत लोकांच्या मर्जीनुसार निर्णय होणार नाही तोपर्यंत हा लढा कायम राहील इथल्या मागासवर्गीय, दलित, आदिवासी शेतकऱ्यांच्या सोबत राहू त्यांना न्याय मिळेपर्यंत संघर्षाची भूमिका कायम राहील असे आश्वासन राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाचे अध्यक्ष तथा पूर्व केंद्रीय गृह राज्यमंत्री हंसराज अहीर यांनी उपोषणकर्त्यांना दिले.या प्रसंगी जिल्हाप्रशासनाच्या वतीने कोरपनाचे तहसीलदार, ठाणेदार, माजी आ. संजय धोटे, माजी आ. सुदर्शन निमकर, खुशाल बोंडे, राजु घरोटे, शिवाजी सेलोकर, रामा मोरे, किशोर बावने, रमेश मालेकर, नारायण हिवरकर, अमोल आसेकर, गंगाधर कुटावार, अरूण मैदमवार, सतिष गोंडलावार, उपसरपंच सतिष काटकर, रामभाऊ कोहचाडे, सखाराम तलांडे, कार्तिक गोन्लावार, सतिष तंगडपल्लीवार, संजय सोडमवार, साई जंगमवार, दुर्वास काटकर, संतोष डोणेवार, सचिन सिडाम, दिनेश आत्राम, बालकुमार कामडे, शंकर डोणेवार, मंगेश नगराळे, मिलींद काटकर यांची व चुनखडी लिज क्षेत्रातील परसोडा, कोठोडा (बु.), रायपूर, गोविंदपुर, कोठोडाखुर्द, पाउंडगुडा, मांगरूड, दुर्गाडी या गावातील शेकडो ग्रामस्थांची उपस्थिती होती.हंसराज अहीर यांनी सांगीतले की दोन महिन्यांपूर्वी या प्रश्नी ओबीसी आयोगाने सुनावणी घेतली होती. त्याचे उत्तर आयोगाला अप्राप्त आहे. आता परसोडा चुनखडी लिज क्षेत्रातील मागासवर्गीय व अन्य शेतकऱ्यांच्या या प्रलंबित प्रश्नाला घेवून आयोग येत्या १५ दिवसात पुढील सुनावणी नागपूर विभागीय कार्यालयात आयुक्त, जिल्हाधिकारी, मायनिंग अधिकारी, आयोगाचे अधिकारी व सर्व संबंधितांच्या उपस्थितीमध्ये घेणार असुन यामध्ये एकमुस्त ७५६.१४ हेक्टर जमिनीच्या अधिग्रहणाचा सर्वसमंतीने निर्णय घेतला जाईल तसे न झाल्यास मायनिंग सुरू करण्याविषयी जिल्हाधिकारी न्यायोचित निर्णय घेतील असे सांगतांनाच अहीर यांनी याबाबत प्रयत्न करण्याचे यावेळी उपस्थित शेतकऱ्यांशी चर्चा करतांना स्पष्ट केले. लिज क्षेत्रातील शेतकऱ्यांची सरसकट शेतजमिनींच्या अधिग्रहणाची मागणी असतांना कंपनी १५ ते ३० वर्षापर्यंत टप्याटप्याने अधिग्रहण करण्याची भूमिका स्वीकारत असेल तर ती संयुक्तिक नसून शेतकऱ्यांच्या भावनांशी कंपनी प्रबंधनाने खेळू नये असेही हंसराज अहीर म्हणाले. या प्रकरणात जमिन अधिग्रहणाबरोबरच रोजगार, रस्ते, प्रदुषण व इतरही अनेक प्रश्न असल्याने यासंदर्भात समोपचाराने प्रश्न मार्गी लागावा अशी आपली भूमिका असल्याचेही ते म्हणाले.





# गिमाटेक्स वणी युनिट येथे ई. एस.आय.सी.अधिकाऱ्यांची भेट

## कामगारांना जास्तीतजास्त सुविधा देण्याचे कंपनी व्यवस्थापनाला आवाहन



**हिंगणघाट । प्रतिनिधी**

इ.एस.आय.सी. हिंगणघाट शाखेचे अधिकारी निरज साखरकर यांनी गिमाटेक्स वणी युनिट येथे भेट देऊन गिमाटेक्स व्यवस्थापनाला कंपनी कामगारांना ई एस आय सी अंतर्गत येणाऱ्या सर्व सुविधा देण्याचे निर्देश दिले.

दि.२ नोव्हेंबर रोजी आयोजीत बैठकीत याविषयी आढावा घेतला, यावेळी कंपनी व्यवस्थापक शाकीर पठाण,वरीष्ठ व्यवस्थापक चंदनसिंग झाला उपव्यवस्थापक जुमडे इत्यादी मान्यवर उपस्थित होते. या बैठकीत वर्धा जिल्हा सुती मिल मजदूर संघटनेचे प्रतिनिधी म्हणून सरचिटणीस पांडुरंग बालपांडे, दामोदर देशमुख,विजय थुल, दिवाकर बरबटकर,राकेश तराळे,श्रावण थुटे, राहुल देशमुख इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

# कुणबी नोंदी सादर करण्यासाठी जिल्हानिहाय समन्वय अधिकारी व विशेष कक्षाची स्थापना

## कुणबी नोंदीचे अभिलेख सादर करा- विभागीय आयुक्त

**नागपूर । प्रतिनिधी**

कुणबी नोंदीचे अभिलेख सादर करण्यासाठी विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी यांनी आज विभागीय समन्वय अधिकाऱ्याची नेमणूक केली आहे. तसेच जिल्हानिहाय समन्वय अधिकारी व विशेष कक्षाची स्थापना करण्यात आली आहे. मराठा समाजातील ज्या व्यक्तींकडे कुणबी नोंदीचे अभिलेख अथवा पुरावे असतील त्यांनी संबंधित जिल्हा समन्वय अधिकारी यांचेकडे ते सादर करण्याचे आवाहन, विभागीय आयुक्त यांनी केले आहे. मराठा समाजातील व्यक्तींना मराठा-कुणबी, कुणबी-मराठा जातीचे जात प्रमाणपत्र देण्यासंदर्भात कार्यपद्धती विहीत करण्यासाठी मा.न्यायमूर्ती संदीप शिंदे (निवृत्त) यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर राज्यात मराठा समाजातील व्यक्तींकडे असलेल्या कुणबी नोंदीचे अभिलेख जमा करण्यासंदर्भात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज दृकश्राव्य माध्यमाद्वारे सर्व विभागीय आयुक्त आणि जिल्हाधिकाऱ्यांची बैठक घेवून निर्देश दिले. त्यानुसार नागपूर विभागासाठी विभागीय समन्वय अधिकारी म्हणून उपायुक्त (सामान्य) प्रदीप कुलकर्णी यांची नेमणूक करण्यात आली आहे. जिल्हा समन्वय अधिकाऱ्यांची नेमणूकही करण्यात आली आहे. यानुसार नागपूर जिल्ह्यासाठी निवासी उपजिल्हाधिकारी सुभाष चौधरी, भंडारा जिल्ह्यासाठी भूसंपादन अधिकारी आकाश अवतारे, चंद्रपूर जिल्ह्यासाठी निवासी उपजिल्हाधिकारी संजय पवार, गोंदिया जिल्ह्यासाठी जिल्हा पुरवठा अधिकारी प्रकाश पाटील, गडचिरोली जिल्ह्यासाठी निवासी उपजिल्हाधिकारी सुनिल सूर्यवंशी आणि वर्धा जिल्ह्यासाठी जिल्हा पुनर्वसन अधिकारी अंजली मरोड यांची जिल्हा समन्वय अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आली आहे. जिल्हानिहाय विशेष कक्षांची स्थापनाही करण्यात आली आहे. ज्या मराठा व्यक्तींकडे कुणबी नोंदी असतील त्यांनी संबंधित जिल्हा समन्वय अधिकारी किंवा विशेष कक्षाकडे कार्यालयीन वेळेत असे अभिलेख सादर करावे, असे आवाहन विभागीय आयुक्तांनी केले आहे.

# भोसे येथे आढळले कुणबी जातीचे पुरावे



**भोसे (क) :** संपूर्ण महाराष्ट्रातील मराठा समाजाला आरक्षण मिळावे यासाठी मनोज जरांगे- पाटील यांनी दुसऱ्यांदा आमरण उपोषण सुरू केले असून त्याचे तीव्र पडसाद संपूर्ण महाराष्ट्रात उमटल्यानंतर शासन खडबडून जागे झाले आहे. दुसरीकडे गावागावांमधील अभ्यासकांनी जुन्या दप्तरांची पडताळणी सुरू केली असून या पडताळणीमध्ये भोसे (ता. पंढरपूर) येथे कुणबी जातीचे पुरावे आढळून आले आहेत.मनोज जरांगे-पाटील यांनी सुरू केलेल्या उपोषणाला बळ मिळावे यासाठी गावोगावी शांततेच्या मार्गाने उपोषणे सुरू आहेत. तसेच कुणबी जातीच्या प्रमाणपत्रांचा अभ्यासही सुरू आहे. भोसे (ता. पंढरपूर) येथील इतिहास संशोधक प्रा. महादेव तळेकर यांनी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील (पूर्वीचे लोकल बोर्ड) दप्तर तपासले असता त्यांना १४ लोकांच्या नावापुढे मराठी भाषेत कुणबी जातीची नोंद असल्याचे आढळून आले.यावेळी त्यांनी १८८१ ते १९६५ पर्यंतचे दप्तर पहिले असता त्यांना साधारण १९०० ते १९१९ पर्यंतच्या दस्तऐवजामध्ये मराठी भाषेत कुणबी जातीची नोंद असल्याचे आढळून आले. त्यापूर्वीच्या नोंदी या मोडी लिपीतील असल्याचे दिसून आले. या मोडी लिपीतील काही नोंदी तत्सम असल्याचे दिसून येत आहे. परंतु त्याची पडताळणी करण्याचे काम सुरू आहे. त्यानंतर अधिकृत आकडा समजून येईल असे प्रा. तळेकर यांनी सांगितले. यावेळी त्यांचे सोबत अजय जाधव, विकास गावंधरे, बापूराव तळेकर पांडुरंग सुरवसे आदि उपस्थित होते.संपूर्ण महाराष्ट्रातील मराठा समाजाला सरसकट कुणबी जातीचे दाखले मिळवेत ही मनोज जरांगे-पाटील यांनी केलेली मागणी रास्त असून त्या मागणीला आता अधिक बळ मिळाले आहे. यासाठी मराठा समाजातील नागरिकांनी शाळेतील दाखले १९०० च्या दरम्यानचे दाखले, त्याच दरम्यानचे खरेदी विक्री दस्त, जन्ममृत्यूची नोंद, स्कीमचे उतारे आदी कागदपत्रांची पडताळणी करावी. यामध्ये निश्चितपणे कुणबी जातीचा उल्लेख असलेल्या नोंदी सापडतील, असे सांगून या सारखे पुरावे आम्ही संपूर्ण जिल्ह्यातील जुन्या शाळेमधील दप्तरांची पाहणी करून गोळा करण्यास सुरवात केली असल्याचे श्री. तळेकर यांनी सांगितले.

# महावितरणचे रमेश शिंदेंना विश्वकर्मा गुणवंत कामगार पुरस्कार

**छत्रपती संभाजीनगर**–महावितरणच्या छत्रपती संभाजीनगर परिमंडलातील कर्मचारी रमेश काकासाहेब शिंदे यांना महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळातर्फे विश्वकर्मा गुणवंत कामगार पुरस्कार महाराष्ट्राचे राज्यपाल रमेश बैस यांच्या हस्ते मुंबईत एक खास समारंभात प्रदान करण्यात आला.

यावेळी कामगारमंत्री डॉ.सुरेश खाडे, शिक्षणमंत्री दीपक केसरकर, प्रधान सचिव (कामगार) विनिता वेद-सिंघल, कामगार कल्याण आयुक्त रविराज इळवे यांची प्रमुख उपस्थिती होती. रोख २५ हजार रुपये, मानपत्र, स्मृतीचिन्ह व पदक असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. शिंदे यांनी आई लीलाबाई, वडील काकासाहेब व पत्नी सुनीता यांच्यासह हा पुरस्कार स्वीकारला.महावितरणमध्ये २०११ पासून काम करणारे शिंदे सध्या हिवरा ३३ केव्ही उपकेंद्रात यंत्रचालक म्हणून कार्यरत आहेत. महावितरणमधील उत्कृष्ट तांत्रिक कामांसोबतच सामाजिक, सांस्कृतिक योगदानाबद्दल त्यांना हा पुरस्कार देण्यात आला. ते छत्रपती संभाजीनगर तालुक्यातील वाहेगाव देमणी येथील रहिवासी आहेत. महाविद्यालयीन स्तरावर आपल्या अभिनय कौशल्याने विविध युवक महोत्सव, राष्ट्रीय आंतरविद्यापीठ स्पर्धा गाजवणाऱ्या शिंदेंनी महावितरणसह कामगार नाट्य स्पर्धा व राज्य नाट्य स्पर्धांतही विविध पारितोषिके पटकावलेली आहेत. उत्कृष्ट व्याख्याता, निवेदक, सूत्रसंचालक असलेल्या शिंदेंचे ’उद्योगाचा कणा : कामगार आणि वास्तव’ हे पुस्तक प्रकाशित झालेले असून. कवितासंग्रह प्रकाशनाच्या वाटेवर आहे. कामगार चळवळीतही ते सक्रीय आहेत.याआधी शिंदे यांना फेब्रुवारी २०२३ मध्ये मिरज येथे झालेल्या कामगार साहित्य संमेलनात कामगार कल्याण मंडळातर्फे वैचारिक लेखन व काव्य लेखनासाठी राज्यस्तरीय साहित्य पुरस्कार प्रदान करण्यात आलेला आहे. तसेच १ मे २०२३ रोजी महावितरणच्या परिमंडल कार्यालयातर्फे त्यांना सहव्यवस्थापकीय संचालकांच्या हस्ते विशेष गुणगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. गतवर्षी महावितरणतर्फेच त्यांना उत्कृष्ट तांत्रिक कामगार पुरस्कारही मिळालेला आहे.

# एसटी बस सेवा पूर्ववत झाल्याने प्रवाशांमधून समाधान



**पंढरपूर –** मराठा समाजाला आरक्षण मिळावे या मागणीसाठी उपोषणाला बसलेले मनोज जरांगे-पाटील यांनी गुरुवारी राज्य सरकारशी झालेल्या वाटाघाटी नंतर आपले आंदोलन २ जानेवारी पर्यंत मागे घेतले आहे. त्यामुळे एसटी महामंडळ प्रशासनाने एसटी बस सेवा शुक्रवारी (ता.३) सकाळपासूनच पूर्ववत सुरू केली आहे. दिवाळीच्या तोंडावर बससेवा सुरळीत झाल्याने प्रवाशामधून समाधान व्यक्त होत आहे.मराठा आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर काही अज्ञात व्यक्तींनी सोमवारी भंडीशेगाव (ता.पंढरपूर) येथे एसटीची बस पेटवून दिली होती. त्यामुळे एसटी प्रशासनाने बस सेवा बंद करण्याचा निर्णय घेतला होता. पंढरपूर बस आगारातून मागील काही दिवसांमध्ये एकही बस सोडण्यात आली नव्हती. परजिल्ह्यातून आलेल्या बसेस देखील पंढरपूर बस आगारामध्येच थांबवण्यात आल्या होत्या. त्यामुळे श्री विठ्ठल दर्शनासाठी एसटी बसने पंढरपूर मध्ये आलेले भाविक बस स्थानकामध्ये अडकून पडले होते. मात्र आता मराठा आंदोलन मागे घेण्यात आल्याने एस टी महामंडळाने आपली बस सेवा पूर्ववत सुरू केली आहे. ऐन दिवाळीच्या तोंडावर एसटी सेवा सुरळीत झाल्यामुळे प्रवाशामधून समाधान व्यक्त होत आहे.मागील तीन दिवसांमध्ये एसटी बसेसच्या अनेक फेऱ्या रद्द झाल्यामुळे एसटी महामंडळाला मोठा आर्थिक फटका बसला आहे. मात्र आता मराठा आंदोलन मागे घेतल्याने शुक्रवारपासून एसटी सेवा पूर्ववत सुरू झाली आहे.आम्ही मागील शनिवारी नागपूरहून पंढरपूरला श्री विठ्ठलाच्या दर्शनासाठी आलो होतो. मात्र एसटी बस सेवा बंद असल्यामुळे पंढरपूर मध्येच अडकून पडलो होतो. आज बस सेवा सुरू झाल्यामुळे परतीच्या प्रवासाला निघालो आहोत.

# तब्बल ३५ लाखांची निविदा; ‘शासन आपल्या दारी’वर जिल्हा प्रशासनाची उधळपट्टी



**सोलापूर :** शासनाच्या योजना जनतेपर्यंत पोचवाव्यात यासाठी शिंदे-फडणवीस-पवार सरकारकडून शासन आपल्या दारी कार्यक्रम राबविला जात आहे. सर्वसामान्यांची सरकारी कार्यालयात अडकलेली कामे व्हावी, असा उद्देश यामागे आहे. जिल्ह्यातील पुढे ढकललेला कार्यक्रम लवकरच होणार आहे.शासनाने केलेल्या कामाचे प्रदर्शन मांडण्यासाठी, फक्त एलईडी स्क्रीन व स्पीकरसाठी जिल्हा प्रशासन ३५ लाख रुपये खर्च करणार आहे. यासंदर्भात टेंडर बांधकाम भागाकडून काढण्यात आले आहे.या कार्यक्रमातून लोकांच्या झालेल्या कामाची जी आकडेवारी दाखवली जात आहे, त्यातून शासकीय कार्यालयात किती प्रकरणे प्रलंबित आहेत, याची प्रचिती येत आहे. या उपक्रमातून किती जणांना फायदा झाला, हा भाग निराळा असला तरी या उपक्रमावर सरकार करत असलेला खर्च मात्र प्रचंड असल्याचे दिसून येत आहे.‘शासन आपल्या दारी’ हा कार्यक्रम घेण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत विद्युत विभागाचे कार्यकारी अभियंता यांनी ऑनलाइन टेंडर जारी केले आहे. २६ ऑक्टोबर ते २ नोव्हेंबर या कालावधीत हे टेंडर भरण्याची मुदत आहे. ६ नोव्हेंबर रोजी ही निविदा उघडण्यात येणार आहे. या निविदेसाठी फक्त बांधकाम विभागातील ठेकेदारालाच मान्य करण्यात आले आहे. हे यातील विशेष बाब दिसून येते.सध्या जिल्ह्यात दुष्काळी परिस्थिती आहे. सरासरीच्या ४० ते ४५ टक्के पाऊस यंदा कमी झाला आहे. जिल्ह्यात पाच तालुक्यांमध्ये टंचाईची परिस्थिती सरकारने जाहीर केली आहे. शेतकऱ्यांना मदत करताना शासनाच्या तिजोरीत खडखडाट असल्याचे सांगितले जात आहे.तरी अशा कार्यक्रमावर स्क्रीन व स्पीकरसाठी ३५ लाखांची उधळपट्टी करण्यात येत असल्याचे पाहून शेतकऱ्यांतून संताप व्यक्त करण्यात येत आहे. अशा कार्यक्रमावर उधळपट्टी करण्याऐवजी शेतकऱ्यांना मदत करण्यात यावी, अशी मागणी होत आहे.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .